# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

मध्यवर्ती कार्यालय, हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन,
सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी रेल्वे स्थानकाजवळ, मुंबई ४०००१३
दूरध्वनी क्र ०२२-६९३२८११७, ईमेल – mlwbstore3@gmail.com


जा.क्र.मका/इमारत/२०२६/ ४५ दिनांक : २५/०६/२०२६

## जाहीर प्रकटन

विषय : महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे मुंबई व ठाणे परिसरातील इमारतींच्या नियमित विद्युत देखभाल व दुरुस्ती कामांसाठी एजन्सी नियुक्त करणेबाबत.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या १) मध्यवर्ती कार्यालय, मुंबई आणि कामगार क्रीडा भवन, प्रभादेवी, मुंबई, २) विभागीय कार्यालय, मुंबई अंतर्गत येणारे सर्व केंद्र तसेच ३) गट कार्यालय, ठाणे अंतर्गत येणाऱ्या सर्व केंद्रांच्या इमारतींच्या विद्युत देखभाल व दुरुस्ती कामासाठी २ वर्ष कालावधीसाठी एजन्सी नियुक्त करणेकरिता इच्छुक एजन्सींकडून खालीलप्रमाणे दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

१) इच्छुक एजन्सीने बंद लिफाफ्यात दरपत्रके सादर करावीत.

२) उपरोक्त नमूद कार्यालयीन पत्यावर दि.०३.०७.२०२६ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत दरपत्रक सादर करावेत. प्राप्त दरपत्रके दि.०३.०७.२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता उघडण्यात येतील.

३) दरपत्रकासोबत संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, पॅन कार्ड, जीएसटी इत्यादी आवश्यक कागदपत्रे जोडावीत. (जीएसटी लागू नसल्यास सीए दाखला अथवा स्वयंघोषणापत्र जोडावे )

४) कामाचा कालावधी ३ वर्ष राहील.

५) सदर कामाची व्याप्ती खालीलप्रमाणे राहील.

- सर्व प्रकारची किरकोळ विद्युत देखभाल दुरुस्ती कामे करणे. यात विद्युत वायरिंग व विद्युत बोर्ड संबंधित सर्व कामे,
- ट्यूब लाईट, पंखे बदलणे सुरळीत सुरु ठेवणेकरिता उपाययोजना करणे.
- कार्यक्रमांसाठी तात्पुरती विद्युत जोडणी करणे.
- पाण्याचे पंप सुरळीत सुरु ठेवणेकरिता उपाययोजना करणे. यात नादुरुस्त झालेले पाण्याचे पंप दुरुस्त करणेकरिता समन्वय साधणे, या कामासाठी पाण्याचा पंप बाहेर काढणे, फिटिंग करणे व इतर अनुषंगिक विद्युत कामे एजन्सी करेल.
- शॉर्ट सर्किट व इतर आकस्मिक विद्युत समस्या सोडवणे.

- या व्यतिरिक्त मंडळ प्रशासनाच्या सूचनेनुसार आवश्यक कामे करणे एजन्सीवर बंधनकारक राहील.
- उक्त नमूद कामांसाठी आवश्यक साहित्य (parts) अथवा खराब झालेले साहित्य (parts) एजन्सीने या कार्यालयाच्या पूर्वसंमतीने खरेदी करणे आवश्यक राहील.
- सदर साहित्य (parts) खर्चाची प्रतिपूर्ती या कार्यालयाकडून एजन्सीस करण्यात येईल. तथापी, साहित्य (parts) बदलण्यासाठी कोणतीही अतिरिक्त मजुरी दिली जाणार नाही.

६) कामाचा दर्जा असमाधानकारक आढळल्यास कामाचा ठेका रद्द करण्याचा अधिकार या कार्यालयास असेल.

७) प्राप्त दरपत्रके स्वीकारण्याचा / नाकारण्याचा / कोणतीही पूर्वसूचना न देता दरपत्रक प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार मा.कल्याण आयुक्तांनी राखून ठेवला आहे.

( मनोज बागले)
प्रसिद्धी व जनसंपर्क अधिकारी
अ. का. भांडार व इमारत शाखा